# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.01.2026** **वारःमंगळवार**

---

1. 2032 पर्यंत द्विपक्षीय व्यापार दोनशे अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्यास भारत आणि युएई यांच्यात सहमती
2. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी नितीन नवीन यांची निवड झाल्याची औपचारिक घोषणा आज होणार
3. जागतिक आर्थिक मंच शिखर परिषदेत महाराष्ट्र सरकारचे विक्रमी साडे 14 लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार
4. राष्ट्र उभारणीत योगदान देणाऱ्या 10 हजार विशेष पाहुण्यांना प्रजासत्ताक दिनाच्या संचलन सोहळ्याचं विशेष आमंत्रण आणि
5. खेलो इंडिया हिवाळी स्पर्धांच्या पहिल्या टप्प्याला आज लडाखमध्ये सुरुवात

**<u>मोदी-यूएई</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा केली. या बैठकीदरम्यान, भारत आणि यूएई यांच्यात संरक्षण, अंतराळ, ऊर्जा, सुपरकंप्यूटिंग आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या बैठकीनंतर माध्यमांना माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, सामरिक संरक्षण भागीदारी,अंतराळ क्षेत्र आणि त्याच्या व्यापारीकरणासाठीच्या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यूएईनं भारतात सुपरकंप्यूटिंग क्लस्टरच्या स्थापनेसाठी सहमती दर्शवली आहे. ते म्हणाले की, 2032 पर्यंत दोन्ही देशातील द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून दोनशे अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्यासही या बैठकीत सहमती दर्शवली आहे. तसंच दोन्ही नेत्यांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध केला. दहशतवादी कृत्यांना वित्तपुरवठा करणाऱ्या, त्यांना पाठिंबा देणाऱ्या किंवा ती कृत्ये करणाऱ्यांना कोणत्याही देशानं आश्रय देऊ नये, यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला, असं विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं.

**<u>करार</u>**

स्वित्झर्लंडमधील दावोस इथं कालपासून सुरू झालेल्या जागतिक आर्थिक मंच शिखर परिषदेच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र सरकारनं विक्रमी 14 पूर्णांक 5 लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली आहे. गेल्या वर्षी दावोस शिखर परिषदेतील राज्याच्या एकूण गुंतवणूकीइतकी गुंतवणूक यावर्षी पहिल्याच दिवशी झाली आहे. या अंतर्गत स्वाक्षरी केलेल्या 19 सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये 15 लाखांहून अधिक रोजगार संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे.

**<u>दावोस-मुख्यमंत्री</u>**

तत्पूर्वी दावोस इथं उभारण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या दालनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. देशात येणाऱ्या परदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे प्रवेशद्वार आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केलं. महाराष्ट्र विश्वासार्ह आहे; त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<u>जागतिक नाणेनिधी-विकासदर</u>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं भारताच्या आर्थिक वाढीबाबत सुधारित अंदाज जाहीर केला आहे. 2025-26 या आर्थिक वर्षासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर 7 ऐवजी 7 पूर्णांक 3 दशांश टक्के राहील, असा सुधारित अंदाज यात व्यक्त

केला आहे. चालू आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत आर्थिक गती अपेक्षेपेक्षा जास्त वाढल्यामुळे हा अंदाज वाढवण्यात आला आहे. 2026-27 या आर्थिक वर्षामध्ये भारताचा विकासदर 6 पूर्णांक 4 दशांश टक्क्यांपर्यंत राहण्याचा अंदाज नाणेनिधीनं वर्तवला आहे.

**<u>एसबीआय अहवाल</u>**

2030 पर्यंत भारताचं दरडोई उत्पन्न 4 हजार डॉलर्सच्या पुढे जाईल असं स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालात म्हटलं आहे. यामुळे जागतिक बँकेच्या वर्गवारीनुसार भारत चीन आणि इंडोनेशियाच्या रांगेत जाऊन बसण्याची अपेक्षा आहे. भारताला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनायला साठ वर्षं लागली मात्र 2014 नंतर केवळ सात वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था दोन ट्रिलियन आणि पुढल्या सात वर्षात तीन ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचली असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<u>प्रजासत्ताक दिन</u>**

येत्या 26 जानेवारीला नवी दिल्लीतल्या कर्तव्य पथावर होणाऱ्या 77 व्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी 10 हजार विशेष पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. या आमंत्रित पाहुण्यांमध्ये सर्वोत्तम स्टार्टअप्स, बचत गट आणि विविध सरकारी योजनांमधील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांचा समावेश आहे. रोजगार निर्मितीमध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या लोकांनाही आमंत्रित करण्यात आलं आहे. तसंच या विशेष पाहुण्यांमध्ये जागतिक पॅरा ॲथलेटिक्स पदक विजेते, अटल इनोव्हेशन मिशन अंतर्गत प्रशिक्षित विद्यार्थी, नैसर्गिक शेती करणारे शेतकरी आणि विविध योजनांच्या लाभार्थींचा समावेश आहे. राष्ट्र उभारणीतील त्यांच्या योगदानाचा सन्मान करणं आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये जनसहभाग वाढवणं या उद्देशानं या पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>भाजप</u>**

भारतीय जनता पक्षाचे कार्याध्यक्ष नितीन नवीन हे पक्षाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष होणार आहेत. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी केवळ नितीन नवीन यांच्याच नावाचा प्रस्ताव आला होता. नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नवीन यांची निवड झाल्याची औपचारिक घोषणा आज केली जाईल, असं भाजपचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. के. लक्ष्मण यांनी सांगितलं.

**<u>रेल्वेमंत्री</u>**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचं काम प्रगतीपथावर असून या मार्गावर ओव्हरहेड विद्युतीकरण खांब बसवण्याचं काम वेगानं सुरू आहे, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सांगितलं. हा प्रकल्प देशाच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रणालीसाठी इलेक्ट्रिक ट्रॅक्शन सक्षम करण्याच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे,असंही रेल्वे मंत्र्यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>चर्चा</u>**

युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी स्वित्झर्लंडमधील दावोस इथं काल अमेरिकन काँग्रेसच्या द्विपक्षीय शिष्टमंडळाची भेट घेतली आणि डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँड ताब्यात घेण्याच्या दिलेल्या धमक्यांबद्दल चर्चा केली. ग्रीनलँड आणि डेन्मार्कच्या सार्वभौमत्वाचा आदर करण्याची गरज असल्याचं सांगत ते जपण्याच्या मुद्द्यावर त्यांनी भर दिला. ग्रीनलँड आणि आर्क्टिकशी संबंधित सुरक्षाविषयक चिंता दूर करण्यासाठी अमेरिका आणि नाटो यांनी परस्पर समांजस्यानं सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं. दरम्यान, ग्रीनलँडची सुरक्षा महत्त्वाची आहे. अमेरिका त्या प्रयत्नात केंद्रस्थानी असेल आणि ब्रिटन नाटोद्वारे मित्र राष्ट्रांसोबत पूर्णपणे योगदान देण्यास तयार आहे, असं ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनी यावेळी सांगितलं.

**<u>मतपत्रिका</u>**

कर्नाटकात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मतपत्रिकेद्वारे घेण्याचा निर्णय हा एक प्रतिगामी पाऊल आहे, असं केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. कर्नाटक राज्य सरकारनं अलीकडेच केलेल्या सर्वेक्षणातही लोक ईव्हीएमवर विश्वास ठेवत असल्याचं ठळकपणे स्पष्ट झालं आहे, असंही जोशी यांनी स्पष्ट केलं.

**विमानतळ**

दक्षिण गोव्यातील रहिवाशांना आणि पर्यटन क्षेत्राला मोठा दिलासा देणारे पाऊल म्हणून दंबोली आंतरराष्ट्रीय विमानतळ नागरी वाहतुकीसाठी पूर्णपणे कार्यरत राहील, असं केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. संरक्षणमंत्री आणि गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यात काल नवी दिल्ली इथं झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंत्र्यांनी हे आश्वासन दिलं आहे.

**सर्वोच्च न्यायालय**

देशातील विमानभाड्यात होणारे अनपेक्षित चढउतार आणि आणि सणांच्या काळात होणारी अवाजवी दरवाढ यांना खीळ घालण्यासाठी त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचे संकेत सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना काल न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठानं विमान कंपन्यांकडून विमानभाड्यात होणाऱ्या अवाजवी वाढीला शोषण असं म्हटलं असून केंद्र आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला त्यांचं उत्तर दाखल करण्यास सांगितलं आहे. केंद्राच्यावतीनं अतिरिक्त महाधिवक्ता अनिल कौशिक यांनी उत्तर दाखल करण्यासाठी वेळ मागितल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने 23 फेब्रुवारी रोजी पुढील सुनावणीसाठी हे प्रकरण सूचीबद्ध केलं आहे.

**पाकिस्तान-आग**

पाकिस्तानमध्ये, कराचीच्या जिना रोडवरील एका इमारतीला लागलेल्या भीषण आगीत किमान 26 लोकांचा मृत्यू झाला असून, 81 जण बेपत्ता आहेत. 17 जानेवारीच्या रात्री उशिरा लागलेली ही आग सुमारे 34 तासांनंतर विझवण्यात आली, मात्र बचावकार्य अजूनही सुरू आहे.

**सायकल स्पर्धा**

पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचं काल पुण्यात अत्यंत उत्साहवर्धक वातावरणात उद्घाटन झालं. रस्त्याच्या दुतर्फा पुणेकरांनी केलेली गर्दी, ढोल ताशांचा गजर, तरुणाईने केलेला रॅम्प वॉक, इंदू या पुणे ग्रँड टूरच्या बोधचिन्हाचे आकर्षक फलक.... असं वातावरण स्पर्धेच्या उद्घाटनाच्या वेळी होतं. येत्या 23 तारखेपर्यंत सुरु राहणाऱ्या या स्पर्धेसाठी शहरात दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया हिवाळी खेळांच्या 2026 च्या पहिल्या टप्प्याला आज लडाखमध्ये लेह इथं सुरुवात होणार आहे. प्रशिक्षक आणि अन्य अधिकाऱ्यांसह एक हजाराहून अधिक पुरुष आणि महिला खेळाडू या स्पर्धेत सहभागी होत आहेत. ऑलिम्पिक खेळ असलेल्या फिगर स्केटिंगचा समावेश हे यंदाच्या स्पर्धेतलं विशेष आकर्षण असणार आहे. देशांतर्गत क्रीडा परिसंस्थेला बळकटी देण्यासाठी आणि खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी खेलो इंडिया उपक्रमाचं आयोजन केल्याचं केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी सांगितलं.

**T-20**

नागपूरच्या जामठा स्टेडियमवर उद्या भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला 20 षटकांचा पहिला क्रिकेट सामना होणार आहे. या सामन्यासाठी हजारो प्रेक्षक येण्याची शक्यता लक्षात घेऊन नागपूर शहर पोलिसांनी वाहतुकीचं चोख नियोजन केलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार